महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३६

# महाराजा सयाजीराव आणि अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद

प्रा. सत्यनारायण आरडे



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३६

# महाराजा सयाजीराव
# आणि
# अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद

प्रा. सत्यनारायण आरडे

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव आणि
अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद
इतिहास
प्रा. सत्यनारायण आरडे
●
प्रकाशन क्रमांक - ५६
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : प्रा. सत्यनारायण आरडे
२०५/६, केदार रेसिडेन्सी,
पोखले रोड, कोडोली,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर -४१६११४
(९८८१७८९७०४)
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ४७ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव आणि अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद

पारंपारिक भारतीय समाजव्यवस्थेत स्वतःला उच्चवर्णीय समजणारी मराठा जात नेहमीच राजकीयदृष्ट्या प्रभावशाली राहिली. राजकीय सत्ता गाजवणाऱ्या मराठा जातीने स्वतःच्या शैक्षणिक उन्नतीकडे मात्र विशेष लक्ष दिले नाही. पारंपरिक समाजरचनेबरोबरच मराठा जातीची शिक्षणाबाबतची अनास्था यासाठी मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरली. ब्रिटिश राजवटीमध्ये सुरू झालेल्या औपचारिक शिक्षणव्यवस्थेचा फायदा उठवत मराठा जातीतील काही व्यक्ती 'साक्षर' झाल्या. या 'साक्षर' व्यक्तींना राजाश्रय देत मराठा जातीच्या शैक्षणिक साक्षरतेचा 'महाप्रकल्प' बडोद्याच्या महाराजा सयाजीरावांनी आपल्या कारकिर्दीत राबवला. विशेष बाब म्हणजे सयाजीरावांच्या या महाप्रकल्पाचा सर्वाधिक लाभ मराठा जातीला झाला. १९०७ मध्ये स्थापन झालेली 'अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद' हा या महाप्रकल्पाच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा होता.

मराठा जातीच्या उत्कर्षात राष्ट्रीय उत्कर्ष शोधणारे सयाजीराव हे आधुनिक भारतातील पहिले राज्यकर्ते आहेत. कारण महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत सर्वाधिक असणारी आणि शिवरायांच्या स्वराज्य निर्मितीत जिद्दीने लढलेली ही जात होती. परंतु निसर्गाधिष्ठित शेती करणारा हा समुदाय आर्थिकदृष्ट्या शिवकालापासूनच संकटात होता. अशा परिस्थितीत या जातीच्या उत्कर्षात सामाजिक कल्याणाची बीजे शोधण्याची दृष्टी सयाजीरावांनी दाखवली. स्वतःच्या जातीचा उत्कर्ष हा शूद्र उद्देश सयाजीरावांच्या मराठा उत्कर्षात नव्हता हे त्यांच्या कामाचे खरे 'वैभव' होते.

मराठ्यांच्या उत्कर्षाचा विचार करणारा हा राजा इतर जातींकडे तितकाच जबाबदारीने लक्ष देत होता. ही बाब भारतातील प्रत्येक राज्यकर्त्याला अनुकरणीय आहे.

## महाराजा सयाजीराव आणि डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन

"विद्ये विना मती गेली..." हे बहुजनास समजावून सांगत महात्मा फुले यांनी १८७३ साली सत्यशोधक चळवळीद्वारे बहुजनांमध्ये शिक्षणाचा प्रसार सुरू केला. याच प्रेरणेने पुढे गंगारामभाऊ म्हस्के व इतर त्यांच्या समविचारी सहकाऱ्यांनी 'डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन'ची १८८३ साली स्थापना केली. या संस्था स्थापनेमागचा हेतू मराठा जातीमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हा होता. याबाबत गंगारामभाऊ

म्हणतात, “मराठा समाजामध्ये अगोदर शिक्षण प्रसार झाला पाहिजे. शिक्षणाने त्यांना खरे-खोटे समजण्याची पात्रता येईल. समाज शिकला नाही तर धार्मिक बाबतीत बंड करण्याची ताकद त्यांच्यात येणार नाही. मराठा समाजाची मुले अगोदर शिकली पाहिजेत. त्या मुलांनी इंग्रजीही शिकून घेतले पाहिजे. हा खर्च मुलांना झेपणारा नाही म्हणून समाजातील ऐपत असलेल्या मंडळींनी मदतीसाठी पुढे आले पाहिजे.” दरम्यान सयाजीराव महाराज पुण्यात आले असता गंगारामभाऊंनी महाराजांना भेटून संस्था स्थापनेमागचा उद्देश स्पष्ट केला.

सयाजीराव महाराजांनी मराठा जातीतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदतीची गरज ओळखून ‘डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन’ला स्थापनेपासूनच २४०० रु. वर्षासन सुरू केले. या वर्षासनाच्या माध्यमातून १८८५ ते १९३९ अशी ५४ वर्षे सयाजीरावांनी केलेली एकूण मदत ५ लाख २९ हजार ५५६ रु. इतकी आहे. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ७२ कोटी ४५ लाख रु. हून अधिक भरते. सयाजीरावांप्रमाणेच शाहू महाराजांनीही सत्ताधिकार प्राप्तीनंतर १८९४ पासून या संस्थेला ५५० रु. वर्षासन चालू केले. यासंदर्भात २३ जानेवारी १८८६ ला खासेराव जाधवांना लंडनला लिहिलेल्या पत्रात सयाजीराव म्हणतात, “आपल्या समाजाला शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून पुण्यात स्थापन झालेल्या एका मराठा संस्थेला आम्ही दरमहा दोनशे रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. आमचा हेतू पूर्ण होण्याच्या दृष्टीने ते अनुदान उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे.”

## शिक्षणातून समाजक्रांती

महाराजा सयाजीरावांची कारकीर्द उत्तम प्रशासन, शिक्षण, धार्मिक, सामाजिक, औद्योगिक सुधारणांच्यादृष्टीने क्रांतिकारक ठरली. त्यांच्या दरबारामध्ये अनेक तज्ज्ञ नवरत्ने होती. त्यांचे ज्ञान आणि हुशारीचा वेळपरत्वे अचूक उपयोग करत सयाजीरावांनी ६४ वर्षे 'उत्तम' राज्यकारभार केला. आपली प्रजा साक्षर आणि त्याही पुढे जाऊन ज्ञानी व्हावी या उद्देशाने सयाजीरावांनी १९०६ मध्ये बडोद्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. याचे पुढे दीर्घकालीन सकारात्मक परिणाम समाजावर झाल्याचे आपल्याला पहायला मिळतात.

आपल्या प्रजेत बहुसंख्य असणाऱ्या मराठा जातीच्या एकूण शैक्षणिक स्थितीविषयी बोलताना सयाजीराव म्हणतात, "मराठा समाज शिकत नाही. आपापसातील दुही हेच या समाजाच्या अध:पतनाचे मुख्य कारण आहे. या समाजाने शिकले पाहिजे. शिक्षणाशिवाय त्यांच्यात परिवर्तन होऊ शकणार नाही." म्हणूनच सयाजीराव महाराजांनी महाराष्ट्रातील बहुजन समाजात शिक्षण प्रसार करू इच्छिणाऱ्या अनेक व्यक्तींना शैक्षणिक संस्थांच्या उभारणीसाठी सढळ हाताने मदत केली. तसेच मराठा व इतर बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या दिल्या.

महात्मा फुले यांची बहुजनांच्या शिक्षण प्रसाराची संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरवत जनतेच्या सर्व स्तरापर्यंत शिक्षण

पोहोचवण्याच्या हेतूने सयाजीराव महाराजांनी १९०६ मध्ये बडोद्यात मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. हा आधुनिक भारताच्या शैक्षणिक इतिहासातील क्रांतिकारक निर्णय होता. आजही मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा हा निर्णय विकसनशील भारतामध्ये शिक्षणाचे खासगीकरण करून समाजातील उपेक्षित घटकांना शिक्षणापासून वंचित ठेवू पाहणाऱ्या सरकारसाठी अनुकरणीय आहे. परंतु लोकसंख्येने सर्वांत मोठा असलेल्या मराठा जातीची दयनीय शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी सयाजीराव महाराजांनी त्यांचे विश्वासू अधिकारी खासेराव जाधवांच्या माध्यमातून मराठा समाजामध्ये शैक्षणिक प्रसारासाठी विशेष प्रयत्न केले. यासाठी महाराजांनी बडोद्यात खासेरावांच्या अध्यक्षतेखाली 'मराठा फंड' स्थापन केला.

## अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची पूर्वपीठिका

१८८० च्या दशकात महात्मा फुलेंच्या नेतृत्वाखाली जुन्नरचे डुंबरे-पाटील आणि अन्य सहकाऱ्यांनी बहुजनांमध्ये शैक्षणिक प्रसारासाठी प्रयत्न सुरू केले. पुढे सयाजीराव महाराजांनी गंगारामभाऊ म्हस्केंच्या माध्यमातून मराठा जातीच्या शैक्षणिक उन्नतीसाठी विशेष प्रयत्न सुरू केले. याचदरम्यान मुंबईत नारायण मेघाजी लोखंडे यांनी त्यांच्या 'दीनबंधू' वर्तमानपत्राच्या माध्यमातून मराठा जातीच्या जागृतीसाठी प्रयत्न चालवले होते. वासुदेव लिंगोजी बिर्जे यांनी अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेवर लिहिलेले अनेक अग्रलेख दीनबंधूमध्ये प्रकाशित

झाले होते. बिर्जे व लोखंडे यांच्या लिखाणावरील विविध व्यक्तींच्या प्रतिक्रिया प्रसिद्ध करून दीनबंधूने मराठा जातीतील जागृतीस प्रोत्साहन दिले.

या प्रक्रियेत 'बडोदा वत्सल'नेही महत्त्वाची भूमिका बजावली. वर्तमानपत्रातील या लेखांच्या वाचनाने पुढारी व हितचिंतक लोकांत परिषदेची स्थापना आणि परिषद कशी भरवावी याविषयी चर्चा होत असे. दरम्यान सत्यशोधक समाजातील नारोशास्त्री बाबाजी महागट, कुलकर्णी व पानसरे यांनी एक शिक्षण परिषद भरवण्याचा उद्देश जाहीर करून हस्तपत्रक प्रसिद्ध केले. या पत्रकात सयाजीराव महाराजांना परिषदेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती करण्यात आली होती. पण या कामी इतर पुढाऱ्यांनी विशेष आस्था न दाखवल्याने परिषद भरवण्याचा हा प्रयत्न यशस्वी झाला नाही. पुढे १९०३ मध्ये मुंबईतील मराठा जातीतील व्यक्तींनी मराठा शिक्षण परिषद भरवण्याच्या उद्देशाने एका समितीची स्थापना केली. १९०४ मध्ये रामचंद्रराव वंडेकर यांनीदेखील मराठा शिक्षण परिषद भरवण्यासाठी प्रयत्न केले. परंतु याही वेळेस काही कारणास्तव मराठा शिक्षण परिषदेची बैठक होऊ शकली नाही.

## मुंबईच्या मराठा समाजाचे मानपत्र

नोव्हेंबर १९०६ मध्ये सयाजीराव महाराज परदेशवारीहून परतल्यानंतर क्षत्रिय मराठा समाजाच्या वतीने मुंबईतील मराठा रहिवाशांनी महाराजांना मानपत्र दिले. या मानपत्रात मराठा

शिक्षण परिषद व मराठ्यांच्या शिक्षणासंबंधी अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या होत्या. या कार्यक्रमात सयाजीराव महाराजांनी उपस्थितांना संबोधित केले. या भाषणात शिक्षणाविषयीचे आपले विचार मांडताना महाराज म्हणतात, "शिक्षणासंबंधाने मला एवढेच सांगायचे आहे की, शिक्षण या शब्दाचा अर्थ करताना फार दूरदर्शीपणा ठेवला पाहिजे. शिक्षण या शब्दाचा अर्थ फार व्यापक आहे. शिक्षणात ज्याप्रमाणे शास्त्र, साहित्य यांचा समावेश होतो त्याचप्रमाणे विद्या, हुन्नर, व्यापार यांचाही समावेश झाला पाहिजे. विद्या, हुन्नर व व्यापारधंदा याच तीन गोष्टींवर देशाची आबादानी अवलंबून असते. या तीन गोष्टीच्या साहाय्याने श्रीमंत वर्ग ज्याप्रमाणे शक्तिमान होतो त्याचप्रमाणे गरीब वर्ग शक्तिमान होतो. देशातील प्रत्येक मनुष्य सुशिक्षित झाला नाही तोपर्यंत देशाची अबादानी व्हावयाची नाही, शिक्षणाने सार्थक कसे होते असे म्हटल्यास शिक्षण आणि प्रत्येक मनुष्य स्वतंत्र होतो म्हणून तो स्वाश्रमी होतो. मात्र प्रत्येक व्यक्तीने आपली निराळीच ज्ञाती आहे हे विसरून जाऊन सर्व उन्नतीचे मूळ जे शिक्षण (विद्या) प्रसार यच्चयावत मानव जातीत सर्वांनी करण्याचा प्रयत्न तनमनधनें करून केला पाहिजे."

भाषणाच्या शेवटी मराठा शिक्षण परिषदेला शुभेच्छा देताना महाराज म्हणतात, "आपण जी मराठा शिक्षण परिषद भरविण्याबद्दल खटपट करीत आहात, त्यात आपणास पूर्ण यश

येवो असे मी मनापासून इच्छितो. ती उत्तम रीतीने पार पाडण्यास माझी मदत आपणास पाहिजे असल्यास ती देण्यास मी मोठ्या खुशीने तयार होईन."

## अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे संकल्पचित्र

मराठा शिक्षण परिषद स्थापन व्हावी यासाठी मुंबईतील अनेक व्यक्ती जनजागृती करत होत्या. ब. का. गायकवाड, जागृतिकार पाळेकर, ज.ज. सावंत इ. व्यक्ती विविध लेखांच्या माध्यमातून मराठा शिक्षण परिषद स्थापनेविषयी आपले विचार मांडत होत्या. ज.ज. सावंत यांनी एका लेखात मराठा शिक्षण परिषद लवकरच भरेल अशी आशा व्यक्त करतानाच तिच्या कार्याची रूपरेषा पुढीलप्रमाणे मांडली होती.

१) परिषदेने प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करणे.

२) प्राथमिक शाळा प्रत्येक खेडेगावात काढण्याचा प्रयत्न करणे.

३) प्राथमिक शाळेत सवड असल्यास धंदे शिक्षणाकडे लक्ष देणे.

४) परिषदेच्या शाखा, पोटशाखा व एजंट हे अनुक्रमे जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणी आणि खेडेगावी असणे.

५) ठिकठिकाणांच्या वजनदार गृहस्थांना व सरकारी अंमलदारांना विद्याहीन लोकांतर्फे त्यांची स्थिती कळवणे व त्यांची योग्य सल्ला आणि मदत घेणे.

६) प्राथमिक शिक्षण फंड गोळा करणे.

७) वेळोवेळी निरनिराळ्या खेडेगावी उपदेशक पाठवून शिक्षणाची महती लोकांच्या डोक्यात भरवणे.

८) परिषदेचे काम वर्षातून ३६५ दिवस चालेल अशी व्यवस्था करणे.

## अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे पहिले अधिवेशन - १९०७

दोन वर्षे अथक प्रयत्नानंतर मराठा शिक्षण परिषदेचे आयोजन करण्याचे निश्चित करण्यात आले; परंतु परिषदेच्या ठिकाणाबाबत मतभेद होते. अखेर ३० डिसेंबर १९०७ रोजी धारवाड येथील सरकारी दरबार हॉलमध्ये पहिली मराठा परिषद भरवण्यात आली. या परिषदेचे अध्यक्षस्थान महाराजा सयाजीराव महाराज गायकवाड यांनी स्वीकारावे अशी सर्वांची इच्छा होती. परंतु प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणास्तव विलायतेत असल्यामुळे महाराज या परिषदेला येऊ शकले नाहीत. त्यामुळे सर्वानुमते या परिषदेच्या अध्यक्षस्थानी खासेराव जाधवांची निवड करण्यात आली. तर स्वागताध्यक्ष भास्करराव जाधव होते. या परिषदेस अप्पासाहेब शिंदे, लक्ष्मणराव इनामदार, श्रीनिवास रोद्द, एच. सी. फॉक्स, दाजीराव विचारे, रामचंद्रराव गायकवाड इ. व्यक्ती हजर होत्या.

या परिषदेच्या पहिल्या बैठकीत बोलताना भास्करराव जाधवांनी परिषदेच्या आयोजनातील 'दीनबंधू' पत्रकाची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली आहे. या भाषणात

भास्करराव जाधव म्हणतात, "दीनबंधू पत्राचा जीर्णोद्धार वासुदेवराव लिंगोजी बिर्जे यांच्या हातून झाला नसता तर आजची परिषद भरविता येणे फार कठीण गेले असते." अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या पहिल्या धारवाड अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानावरून केलेल्या भाषणात खासेराव जाधवांनी बडोद्यात सयाजीरावांनी १९०६ मध्ये लागू केलेल्या सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण कायद्याची ऐतिहासिकता स्पष्ट केली आहे. या भाषणात खासेराव म्हणतात, "ही शोचनीय स्थिती सुधारण्यासाठी ज्ञानप्रसार हा एकच इलाज आहे. श्रीमंत सयाजीराव महाराज हे फार धोरणी राजे आहेत.... आपल्या राज्यात गावोगावी शाळा स्थापन करून त्यामध्ये प्रत्येक मुला-मुलींनी शाळेत गेले पाहिजे असा कायदा केला आहे. अवघ्या दीड वर्षाच्या कालावधीत या कायद्याचा उत्तम परिणाम नजरेस पडत आहे. हल्ली दर तीन गावास दोन शाळा या प्रमाणाने शाळा स्थापन झाल्या आहेत."

खासेराव जाधव यांचे विस्तृत अध्यक्षीय भाषण झाल्यानंतर परिषदेच्या पहिल्या दिवशी निबंध वाचण्यात आले. त्यात रावसाहेब बापूराव रामचंद्र आवटे (मराठा शिक्षण परिषद - तिची आवश्यकता उद्देश आणि कार्य), भगवंतराव बळवंतराव पाळेकर (मराठी लोकांत शिक्षण प्रसार होण्याकरिता काय केले पाहिजे), रा. रा. नारायणराव शंभूराव वराडकर (परिषदेसंबंधी दोन शब्द), सौ. चंद्राबाई नारायणराव पवार (स्त्रीशिक्षण) इ. दहा

व्यक्तींचा समावेश होता. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी एकूण १६ ठराव पास करण्यात आले. ठरावानंतर परिषदेच्या फंडास ६६५ रुपयांची मदत जमा झाली. त्यातील पाचशे रुपयांची प्रॉमिसरी नोट रावसाहेब रामचंद्रराव धर्माजी रोकडे पाटील यांनी दिली. तर परिषदेच्या खर्चासाठी शाहू महाराजांनी १०० रु., दाजीराव विचारे २० रु., रामचंद्रराव गायकवाड १५ रु., मानाजीराव कदम १० रु. अशी आर्थिक मदत केली. अशारीतीने अखिल भारतीय मराठा शिक्षण याप्रकारे परिषदेचे दोन दिवसीय पहिले अधिवेशन यशस्वीपणे पार पडले.

## दुसरे अधिवेशन – १९०८

मराठा शिक्षण परिषदेचे काम पुढे जोमाने चालू ठेवण्यासाठी आणि त्याचा विस्तार करण्यासाठी दरवर्षी बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार दुसरे अधिवेशन नाशिकला घेण्याचे नियोजन करण्यात आले. परंतु अचानक अधिवेशनापूर्वी दहा-बारा दिवस महामारीची साथ सुरू झाल्यामुळे नाशिकची नियोजित परिषद रद्द करून मुंबई येथील टाऊन हॉलमध्ये ३० डिसेंबर १९०८ रोजी घेण्यात आली. या परिषदेस सरदार नरसिंगराव घोरपडे, सरदार मूळचंदराव कदम, सरदार आप्पासाहेब गजेंद्रगडकर, शेठ तुकाराम रावजी यांच्याबरोबरच दीड हजारहून अधिक मराठा व्यक्ती हजर होत्या.

या बैठकीचे वर्णन करताना ‘ज्ञानप्रकाश’कार लिहितात, “महाराष्ट्रातील चारही ठिकाणचे सरदार, दरकदार, मानकरी व थोर थोर मराठे गृहस्थ आपापल्या मराठेशाही दरबारी पोशाखानिशी आलेले होते. त्यामुळे सभेची काही अपूर्व शोभा दिसत होती. त्या शोभेची कल्पना संस्थानी प्रजेला अगर ज्याने मराठीशाही दरबारी थाट अवलोकन केला असेल त्यालाच होईल. आज मराठ्यांचे पूर्ववैभव नष्ट झाले आहे, त्यांचे तेज आज इतिहासगत होऊन गेले आहे, त्यांचे शौर्य, औदार्य आणि स्वामी कार्य आज कालगतीने विपरीत परिस्थितीला पोहोचले आहे; तथापि त्यांच्या सद्गुणांचा लोप झालेला नाही. त्यांचा धीरोदात्त स्वभाव विलुप्त झालेला नाही. ते गुणधी, सालस, प्रेमळ, उदात्त, सरळ वृत्तीचे व स्नेहशील मराठे बंधू एकत्र जमलेले पाहून कोणाला आनंद होणार नाही.”

या बैठकीचे अध्यक्ष देवास संस्थानचे तुकोजीराव पवार महाराज प्रकृती अस्वस्थतेच्या कारणावरून गैरहजर राहिल्यामुळे ऐनवेळी त्यांच्या गैरहजेरीत खासेराव जाधवांना दुसऱ्यांदा अध्यक्षपदाचा मान मिळाला. सभेची सुरुवात परिषदेचे चिटणीस भास्करराव जाधव यांनी अहवाल वाचनाने केली. यामध्ये मागील वर्षभरात केलेल्या कार्याचा वृत्तांत आणि संपूर्ण भारतातील प्रमुख बाराशे मराठा जातीतील व्यक्तींची यादी वाचून दाखवतानाच संपूर्ण कार्याचा अहवाल छापून

प्रसिद्ध केल्याचे त्यांनी नमूद केले. अहवाल वाचनानंतर स्वागत कमिटीचे अध्यक्ष मानाजीराव कुवरजी राजेशिर्के यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून आपल्या भाषणास सुरुवात केली.

याप्रसंगी बोलताना ते म्हणाले, "विद्याप्रसाराच्या कामी श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांचे प्रयत्न अभिनंदनीय आहेत. तसेच श्रीमंत महाराज अलिजाबहार माधवराव शिंदे आणि श्रीमंत छत्रपती शाहू महाराज कोल्हापूर यांनी शिक्षणाच्या बाबतीत पुष्कळ प्रयत्न चालवले आहेत. परंतु हे प्रयत्न आपल्या सारख्या प्रचंड समुदायास विद्यासंपन्न करण्यास पूर्णपणे समर्थ नाहीत. याकामी आपल्या एकंदर समाजाकडून एकजुटीने कार्य होईल तरच म्हणण्यासारखा परिणाम दृष्टीस पडेल. या कामी आपण सर्वांच्या ऐक्याने आपले प्रयत्न सुरू करण्याच्या हेतूने मराठा शिक्षण परिषदेची स्थापना केली आहे. परिषदेचा मुख्य हेतू विद्या प्रसार करणे हाच एक असला पाहिजे व मुख्यतः ज्ञान प्रसाराच्या मार्गाने आपली उन्नती करून घेतली पाहिजे. ज्ञान ही मोठी जबर शक्ती आहे व आपला समाज उन्नत आणि सामर्थ्यवान होण्याला तिचीच आराधना केली पाहिजे. सामाजिक धार्मिक व नैतिक वगैरे हरेक बाबतीत उन्नती करून घेण्याला विद्या हे साधन आहे. म्हणून आपल्या समाजातील भावी तरुण पिढी ज्ञानसंपन्न होईल असे मार्ग योजण्याचे तयारीस आपण लवकर लागले पाहिजे."

अध्यक्षीय भाषणामध्ये खासेराव जाधवांनी एकमेकासंबंधीचा अविश्वास व गैरसमज दूर करण्यासाठी एके ठिकाणी जमून विचारांची देवाण-घेवाण गरजेचे असल्याचे अधोरेखित केले. यामुळे अज्ञान दूर होऊन साधक-बाधक चर्चा होते. परिणामी समाजाच्या उन्नतीस गती लाभते. म्हणून अशा प्रकारच्या परिषदा सातत्याने भरवल्या गेल्या पाहिजेत असे मत खासेरावांनी व्यक्त केले. या भाषणात खासेराव म्हणतात, "आपण मराठे म्हणजे क्षत्रिय असून आपले वीर्य जिव्हेत नाही. बाहुत आहे. म्हणून अमुक सुधारणा करावी, तमुक करावी, असे कागदी ठराव करण्याची आपणास जरुरी नाही.

आपणास ज्या गोष्टी योग्य वाटतील त्या कृतीतच आल्या म्हणजे झाले. आंतरिक कळकळ पाहिजे म्हणजे सर्व होते. ती नसेल तर परिषदेतील मोठी मोठी भाषणे म्हणजे 'मोले घातले रडाया। नाही आसूं आणि माया' या उक्तीप्रमाणे हास्यास्पद होत." या अध्यक्षीय भाषणानंतर कै. वासुदेव बिर्जे यांच्या पत्नी तान्हूबाई बिर्जे यांनी 'दीनबंधू' वर्तमानपत्र चालू ठेवण्यासाठी मदत मिळण्यासंदर्भात विनंती केली. त्यांच्या विनंतीनुसार खासेरावांच्या १०० रु.सह सर्वांनी एकूण ४५० रु. रक्कम गोळा करून दिली.

## तिसरे अधिवेशन – १९०९

दुसऱ्या अधिवेशनाच्या समाप्तीप्रसंगी पुढील अधिवेशन वऱ्हाडात घेण्याची विनंती विदर्भातील मराठा नेत्यांनी केली.

या विनंतीनुसार मराठा परिषदेचे तिसरे अधिवेशन २८ डिसेंबर १९०९ रोजी अमरावती येथे भरवण्यात आले. या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी सयाजीरावांचे बंधू संपतराव गायकवाड तर स्वागताध्यक्ष म्हणून माधवराव शंकरराव देशमुख यांची निवड करण्यात आली. या परिषदेस खासेराव जाधवांसह भारतातील विविध प्रांतातून मान्यवर मंडळी व श्रोते उपस्थित होते.

या परिषदेच्या स्वागतपर भाषणात प्रत्येक जातीतील शिक्षण प्रसाराचे महत्त्व विशद करताना माधवराव देशमुख म्हणतात, "प्रत्येक गोष्ट करण्यास ज्ञान पाहिजे. ज्ञान विद्येने प्राप्त होते व विद्येची द्वारे सरकारने सरसकट सर्व ज्ञातीस मोकळी केली आहेत. त्याचा फायदा प्रत्येक ज्ञात घेत आहे. आज मुसलमान, शिंपी, माळी, प्रभू, सारस्वत, देवरुखे, जैन, लिंगायत ह्या जाती सभा करून शिक्षण प्रसारक मंडळें स्थापन करून आपापल्या ज्ञातीस शहाणे करत आहेत. आपल्या समाजास हे फार नेटाने केले पाहिजे. आपण नेहमी समाजास मार्गदर्शक व संरक्षक आहोत अशी आपली ख्याती आहे. तेव्हा समाजाचे कल्याण व्हावे आणि आपला पहिला मोठेपणा कायम राहावा म्हणून आपणास विद्येत फारच झपाट्याने मजल मारली पाहिजे."

माधवराव देशमुखांनंतर झालेल्या अध्यक्षीय भाषणात संपतराव गायकवाड यांनी आपल्या पूर्वजांच्या इतिहासाला शोभेल असे कार्य करण्यासाठी सर्व मराठ्यांनी एकत्र येऊन या परिषदेच्या ध्येय-धोरणाच्या पूर्तीसाठी झटण्याचे आवाहन केले.

या भाषणात संपतराव म्हणतात, “बहुजन समाजाची स्थिती सुधारण्याचा उत्तम आणि खात्रीचा उपाय म्हणजे शिक्षण होय. सर्व सुधारणेचे मूळ शिक्षण आहे. शिक्षणाच्या अभावामुळेच समाजाची अवनती झाली. ज्ञान ही एक प्रचंड शक्ती आहे. या शक्तीपुढे सर्व शक्ती तुच्छ आहेत. पाश्चिमात्य राष्ट्रांनी ज्ञानाच्या जोरावर उन्नती साधली आहे.” परिषदेच्या दुसऱ्या दिवशी उपस्थितांना संबोधित करताना खासेराव जाधवांनी “तेरा बलुत्यांच्या जोडीला आमच्या शेतकरीवर्गाने ‘विद्यादान’ हे चौदावे बलुते अंगावर घ्यावे” असे म्हणत मराठा शिक्षण फंडास मदत करण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीनुसार अर्ध्या तासात १०,००० रु.हून अधिक देणगी जमा झाली. त्यात संपतराव गायकवाड (५०० रु.), तुकाराम पाटील (६२५ रु.), बापूराव जानराव (५०० रु.), सोनाजी टिक्के (५०० रु.) व यशोदाबाई जोशी (२०१ रु.) यांच्या देणग्यांचा समावेश होता.

विशेष बाब म्हणजे या अधिवेशनाला सयाजीराव महाराज स्वतः उपस्थित होते. यावेळी बोलताना शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी त्यांना प्रगत कृषी साधने देण्याची गरज सयाजीरावांनी विशद केली. याचवेळी शेतकऱ्यांच्या हुशार मुलांना शेती, उद्योग आणि इतर विषयांच्या उच्चशिक्षणासाठी परदेशात पाठवण्याची आवश्यकता सयाजीरावांनी व्यक्त केली. ‘संसारकार्याइतकेच समाजकार्याला महत्त्व देणारा स्वार्थत्यागी व खऱ्या कळकळीची व्यक्तीच समाजसुधारणेचे कार्य उत्तम पद्धतीने

करू शकत असल्याचे' मत महाराजांनी मांडले. महाराजांचे हे मत आज गलितगात्र झालेल्या मराठा जातीने समजून घेतले तर मराठ्यांसाठी ती 'संजीवनी' ठरेल. या अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी रखमाबाई गायकवाड यांनी 'स्त्री शिक्षणाची आवश्यकता' हा निबंध श्रोत्यांपुढे स्वतः अस्खलितपणे वाचून दाखवला.

## चौथे अधिवेशन – १९१०

अमरावती अधिवेशनात झालेल्या निर्णयानुसार अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे चौथे अधिवेशन २७-२८ डिसेंबर १९१० या कालावधीत बडोद्यातील इंदुमती महालात भरवण्यात आले. या परिषदेचे अध्यक्षस्थान मालेगावचे सरदार शंभूसिंहजी अमरसिंहजी जाधव यांनी भूषवले. तर स्वागताध्यक्षपदी संपतराव गायकवाड यांची निवड करण्यात आली. या अधिवेशनास सयाजीराव महाराजांसह बडोद्यातील राजपुत्र धैर्यशीलराव, काशीराव जाधव, जनरल नानासाहेब शिंदे, विद्याधिकारी मसानी, सरदार दादासाहेब माने इ. मान्यवर उपस्थित होते.

या परिषदेमध्ये मराठा समाजाच्या शिक्षणासाठी एक जनरल फंड तयार करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव संमत करण्यात आला. या मराठा जनरल फंडासाठी सयाजीराव महाराजांनी १,२५,००० रुपयांची देणगी दिली. तर सयाजीरावांच्या पत्नी महाराणी चिमणाबाईंनी मराठा मुलींच्या शिक्षणासाठी १ लाख रु. ची स्वतंत्र रक्कम दिली. बडोद्याचे माजी दिवाण कै. रा. वि.

धामणस्कर यांनी त्यांच्या मृत्युपत्रामध्ये अखिल भारतीय मराठी शिक्षण परिषदेच्या कामासाठी आर्थिक मदत देण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार धामणस्कर यांच्या पत्नी जानकीबाई धामणस्कर यांनी या फंडासाठी ७५ हजार रु. ची देणगी दिली. या परिषदेच्या निमित्ताने मराठा समाजाच्या शिक्षण प्रसारासाठी बडोद्याने एकूण ३ लाख रुपये 'पुरविले'. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ८३ कोटी २० लाख रुपयांहून अधिक भरते.

बडोद्यातील ही परिषद अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या इतिहासातील क्रांतिकारक टप्पा होता. कारण या अधिवेशनात जेवढा निधी उभा राहिला तेवढा निधी त्यानंतरच्या कोणत्याही परिषदेत उभा राहिला नाही. खऱ्या अर्थाने या अधिवेशनानिमित्त सयाजीरावांनी दिलेल्या भक्कम आर्थिक पाठबळाने मराठा शिक्षण परिषद पुढे भरीव योगदान देऊ शकली. दुर्दैवाने आजवर मराठा समाज या क्रांतिकारक इतिहासापासून अनभिज्ञ राहिला. या व्यतिरिक्त बंगलोरचे बी. व्यंकटराव (४०,००० रु.) आणि सरदार शंभूसिंग राजे (१,००० रु. रोख रक्कम व ५ हजार रु. ची पॉलिसी) यांनी मराठा शिक्षण परिषदेच्या कार्यास भक्कम आर्थिक आधार पुरविला.

या अधिवेशनाच्या निमित्ताने खासेराव जाधव यांच्या विनंतीवरून महाराजांनी मराठा फंडासाठी सुरुवात म्हणून मोठी रक्कम दिली. खासेराव जाधवांनी त्यामध्ये स्वत:चे २५ हजार रु. घातले. बडोद्यातील या मराठा फंडाचे खासेराव अध्यक्ष होते.

या फंडाच्या शिष्यवृत्तीने शेकडो मराठे बडोद्यात जाऊन शिकले. यातील पश्चिम महाराष्ट्रातील काही सर्वपरिचित नावे म्हणजे, माजी मंत्री वाळव्याचे राजारामबापू पाटील, स्वामी विवेकानंद संस्थेचे संस्थापक बापूजी साळुंखे, शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू आप्पासाहेब पवार इ. आहेत.

मराठा शिक्षण परिषदेच्या पहिल्या तीन अधिवेशनांमध्ये प्रामुख्याने मराठा समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक स्थितीवर चर्चा करण्यात आली होती. स्वागताध्यक्ष संपतराव गायकवाड यांनी आपल्या भाषणात पारंपरिक भारतीय शिक्षण व्यवस्थेतील त्रुटीवर अचूक बोट ठेवले.

या भाषणात संपतराव गायकवाड म्हणतात, “शिक्षणाच्या बाबतीत इंग्रज सरकार व आपले संस्थानिक आपापल्यापरी नानाप्रकारचे प्रयत्न करून राहिले आहेत. तथापि माझ्या मते जी एक गोष्ट अवश्य पाहिजे, तिजकडे कोणाचे लक्ष गेलेले दिसत नाही. रिसर्च (Research) आणि इनिशिएटिव्ह (Initiative) या विषयांकडे कोणी लक्ष दिले नाही. आपल्या लोकांत कसब आहे, पुष्कळ कल्पक कारागीर आहेत; परंतु त्यांचे कसब आणि बुद्धी वृद्धिंगत करण्यास उत्तेजन पाहिजे, ते मिळत नाही.”

संपतराव गायकवाड हे सयाजीरावांचे सख्खे लहान बंधू होते. त्यांच्या भाषणात व्यक्त झालेले चिंतन फारच क्रांतिकारक होते. कारण ज्या काळात मराठ्यांचा अक्षरओळखीसाठी संघर्ष चालू होता त्या काळात संपतराव Research आणि Initiative चा

आग्रह धरत होते. त्यांच्या या आग्रहातून बडोद्यामध्ये किती उच्चकोटीचे बौद्धिक पर्यावरण सयाजीराव महाराजांनी निर्माण केले होते हे कळते. राज्यकर्ता जर ज्ञानमार्गी असेल तर त्याचे परिणाम किती क्रांतिकारक होतात हे स्पष्ट होते.

## सयाजीरावांचे द्रष्टे मार्गदर्शन

१९१० च्या या बडोदा अधिवेशनप्रसंगी सयाजीरावांनी केलेले भाषण म्हणजे मराठ्यांसह इतर समाजातील सर्वच घटकांच्या शैक्षणिक उत्कर्षासाठी त्यांनी आखून दिलेला रोडमॅपच आहे. परिषदेने ठराव संमत करण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्या अंमलबजावणीसाठी कठोर मेहनत करतानाच आपल्या कामाचे वेळोवेळी मूल्यमापन करण्याचा सल्ला सयाजीरावांनी या अधिवेशनात दिला. अधिवेशनामध्ये केवळ ५-६ ठराव करून त्यांचा पाठपुरावा करणे आवश्यक असल्याचे मत सयाजीरावांनी याप्रसंगी व्यक्त केले. वेगवेगळ्या शहरातील सभासदांऐवजी एकाच शहरातील ४-५ सभासदांची समिती नेमल्यास परिषदांमध्ये संमत झालेल्या ठरावांची अंमलबजावणी करणे अधिक सोयीचे ठरेल. शिक्षण परिषदेच्या माध्यमातून मराठा समाजाच्या शैक्षणिक-आर्थिक अडचणी दूर करतानाच त्यांच्या शिक्षणासाठीचा परिपूर्ण अभ्यासक्रम आखण्यासंदर्भात सयाजीरावांनी केलेल्या सूचना मौल्यवान आहेत.

याप्रसंगी सयाजीरावांनी अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेला केलेल्या सूचनांचे विवेचन अत्यावश्यक ठरते.

१) मराठा समाजाच्या हिताच्या दृष्टीने अभ्यासक्रमात काही महत्त्वाचे बदल करणे जरुरीचे आहे आणि अशा बदललेल्या अभ्यासक्रमास सर्व मराठा संस्थांमधून वाव मिळावा.

२) व्यवहारोपयोगी शेतकी ज्ञान, अर्थशास्त्राचे जरुरीपुरते ज्ञान, ठोकळ कायद्याचे ज्ञान आणि वसुलीचा कारभार यांची खेड्यात अत्यंत जरुरी आहे. या बाबींचा प्रामुख्याने अभ्यासक्रमांमध्ये विचार व्हावा.

३) शारीरिक शिक्षण व लष्करी शिक्षणाकडे दुर्लक्ष न करता मराठा शिक्षण संस्थेतून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या पदवीधरांना योग्य नोकरी मिळवून देण्यासाठी परिषदेमार्फत एक कमिटी नेमली जावी.

४) विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासंबंधी आवड उत्पन्न होण्यासाठी काही अंशी शिष्यवृत्त्या व बक्षिसेही ठेवली जावीत. प्रत्येक वर्गामध्ये पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना ठराविक रक्कम बक्षीस म्हणून द्यावी.

मराठा समाजाची आजची स्थिती लक्षात घेता ११३ वर्षांपूर्वी सयाजीरावांनी केलेल्या सूचना आजही तंतोतंत लागू पडतात.

सयाजीरावांनी या भाषणात मार्टिन ल्युथर किंगपासून संत एकनाथ, संत नामदेव आणि तुकाराम महाराजांपर्यंतचे दाखले देत जातीय-धार्मिक ऐक्य साधून समाजाची प्रगती करण्याची

आवश्यकता स्पष्ट केली. शिवाजी महाराजांआधीच्या महाराष्ट्राची स्थिती विशद करतानाच हिंदवी स्वराज्य उदयाला येण्यामागची कारणे मराठा समाजाने समजून घेणे आवश्यक असल्याचे मत सयाजीरावांनी व्यक्त केले. महाराजांचे हे मत प्रामुख्याने शिवभक्तांनी समजून घेतले तरच शिवचरित्रातून प्रेरणा घेऊन सकारात्मक परिवर्तन घडू शकेल. अन्यथा नुसता जयघोष शेवटी निराशा पदरी टाकेल.

११३ वर्षांपूर्वी अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या माध्यमातून मराठा समाजाच्या उत्कर्षासाठी सयाजीरावांनी केलेले सर्वतोपरी प्रयत्न आरक्षणासाठी मोर्चे काढणाऱ्या मराठा समाजाने आजवर समजून घेतले नाहीत. सयाजीरावांचे हे प्रयत्न वेळीच समजून घेतले असते तर 'एक मराठा, लाख मराठा'चा जयघोष करत लाखोंचे मोर्चे काढण्याची नामुष्की मराठा समाजावर ओढवली नसती.

## अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची सर्वसमावेशकता

स्थापनेपासूनच अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेवर जातीयतेचा आरोप करण्यात येत होता. या पार्श्वभूमीवर परिषदेच्या नावातील 'मराठा' हा शब्द विशिष्ट जातीवाचक अर्थाने न वापरता व्यापक अर्थाने वापरल्याचे परिषदेच्या स्थापनेवेळीच 'दीनबंधू'मध्ये स्पष्ट करण्यात आले. या संदर्भात दीनबंधूकार लिहितात, "परिषदेच्या वेळी मराठ्यांशिवाय इतर जातींतील मंडळी हजर राहिल्यास काही वावगे ठरणार नाही." परिषदेच्या

वतीने जाहीर करण्यात आलेल्या या भूमिकेनुसार परिषदेच्या अधिवेशनांना विविध जातींच्या व्यक्ती उपस्थित राहत. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेस नियमितपणे हजर राहत.

१९१४ च्या पुणे येथील अधिवेशनास रँग्लर परांजपे, ना.वा. टिळक, न.चिं. केळकर, लक्ष्मीबाई टिळक, डॉ. भांडारकर, वि. शं. पटवर्धन उपस्थित होते. 'मराठा म्हणविण्यास सार्थ अभिमान वाटत असल्याचे' स्पष्ट करत रँग्लर परांजपेंनी परिषदेवर होणारा जातीयतेचा आरोप फेटाळला. तर अस्पृश्यता निर्मूलनासाठी अस्पृश्य मुलांना मराठ्यांच्या शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश देण्याचा ठराव परिषदेने या अधिवेशनात केला.

पुढे १९६२ मध्ये अमरावती येथे बडोद्याचे फत्तेसिंहराव महाराजांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अधिवेशनात 'मराठा' या शब्दाची व्याप्ती निश्चित करण्यात आली. या परिषदेमध्ये "मराठा व तत्सम मराठी भाषिक समाज जो शैक्षणिक, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेला आहे याचा मराठा या शब्दात समावेश करावा" असा ठराव संमत करण्यात आला. वऱ्हाड, खानदेश, कोकण, नागपूर इ. प्रांतातील कुणब्यांचा 'मराठा' या संज्ञेत समावेश केला गेला. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या जातींना सामावून घेतल्यामुळे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे सर्वसमावेशकत्व स्पष्ट होते.

## अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची वाटचाल

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे सहावे अधिवेशन २४ ते २६ डिसेंबर १९१२ दरम्यान तुकोजीराव पवार महाराजांच्या अध्यक्षतेखाली धुळे येथे पार पडले. सरदार बळवंतराव कदम बांडे हे या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष होते. स्वागतपर भाषणात बोलताना बळवंतराव कदम यांनी अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या स्थापनेतील सयाजीराव महाराज, गंगारामभाऊ म्हस्के आणि शाहू महाराज यांचे अन्योन्य स्थान स्पष्ट केले होते. अखिल भारतीय शिक्षण परिषदेच्या कामासाठी आर्थिक साहाय्य उभे करण्याच्या उद्देशाने या अधिवेशनात खासेराव जाधवांनी 'झोळीचा ठराव' मांडला.

२८-३० डिसेंबर १९१३ दरम्यान नाशिक येथे झालेल्या सातव्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष शंकरराव कदम यांनी आपल्या भाषणात स्वतःच्या संस्थानातील मोफत माध्यमिक व उच्चशिक्षण उपलब्ध करून देणाऱ्या बडोद्याचे सयाजीराव गायकवाड आणि ग्वाल्हेरचे माधवराव शिंदे या दोन राज्यकर्त्यांचा विशेष गौरव केला. तर २७-२९ डिसेंबर १९१७ दरम्यान खामगाव येथे शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अधिवेशनात खासेराव जाधवांनी वऱ्हाड प्रांतात वऱ्हाड हायस्कूल काढण्यासाठी झोळीचा ठराव मांडला. यावेळी

एकूण ५०,००० रु.ची मदत जमा झाली. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी शाहू महाराजांच्या अनुपस्थितीत खासेराव जाधवांनी अध्यक्षीय स्थान भूषवले.

## सयाजीरावांप्रति कृतज्ञता

७-८ एप्रिल १९२८ दरम्यान सोलापूर येथे झालेल्या २० व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी भास्करराव जाधवांची निवड करण्यात आली होती. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष भगवानराव पिलीवकर यांनी आपल्या भाषणात 'सयाजीराव महाराजांनी केलेल्या आर्थिक मदतीमुळे अनेक मराठा तरुण परदेशात जाऊन विद्यासंपन्न झाल्या'ची कृतज्ञता व्यक्त केली. विशेष बाब म्हणजे या अधिवेशनाचे अध्यक्ष भास्करराव जाधवांचे शिक्षणदेखील स्थापनेपासून सयाजीरावांचे भक्कम आर्थिक पाठबळ लाभलेल्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या शिष्यवृत्तीवर झाले होते. हा एक सुखद 'योगायोग' होता.

२० मार्च १९३३ रोजी पुण्यातील ७४ संस्थांनी एकत्र येत सयाजीराव महाराजांचा सत्कार केला. यावेळी मराठा समाजातर्फे महाराजांना मानपत्र देण्यात आले. याप्रसंगी शाहूंच्या मराठा बोर्डिंगचे पहिले विद्यार्थी पी.सी. पाटील यांनी दिलेला कबुलीजबाब मराठ्यांच्या उत्कर्षातील सयाजीरावांचे स्थान निश्चित करणारा आहे. या भाषणात पी.सी. पाटील म्हणतात, "मराठा समाजांत शिक्षणाच्या वृद्धीसाठी आपण जे अत्यंत बहुमोल परिश्रम घेत आहांत त्याबद्दल मराठा समाज अत्यंत

ऋणी राहील यांत शंका नाही. माझ्या वेळी कॉलेजात शिक्षण घेणारे मराठे चार पांचच होते, पण आता ती संख्या ३०० वर गेली आहे. याचे सर्व श्रेय महाराज आपणाला आहे हे आम्ही कधीही विसरणार नाही.”

या प्रसंगी देण्यात आलेल्या मानपत्रातील आशयाचे चिंतन मराठा जातीचा ‘कळवळा’ असणाऱ्या एकही संशोधकाने आजअखेर केले नाही. परिणामी मराठा जातीच्या उत्कर्षाचा सलग आणि अधिकृत इतिहास लिहिला गेला नाही. हे मानपत्र म्हणते, “या ठिकाणी मोठ्या अभिमानाने सांगावेसे वाटते की, आपल्या सेवेतून निवृत्त झालेले लेफ्टनंट बाबूराव जगताप यांनी श्री शिवाजी मराठा सोसायटीतर्फे मराठी व इंग्रजी शाळा चालवून गेल्या १५ वर्षांत व तत्सम जातींमध्ये शिक्षणाचे प्रसारास बरीच मदत केली आहे. आज सोसायटीने चालविलेल्या तीन शाळांमधून ९०० विद्यार्थी असून १३० पुढारलेल्या जातीचे, ५३० मराठा जातीचे व २४० तत्सम जातींचे आहेत. रा. बाबूराव सारखा कार्यनिष्ठ पुरुष महाराज साहेबांनी आमच्या स्वाधीन केल्याबद्दल आम्ही महाराजांचे ऋणी आहोत.”

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या रौप्यमहोत्सवा निमित्त २५ बैठकांचा सविस्तर वृत्तांत छापून प्रसिद्ध व्हावा असे १९२९ च्या २१ व्या बैठकीत सातव्या ठरावामध्ये ठरले होते. त्यानुसार ऑगस्ट १९४१ मध्ये ‘गेली पंचवीस अधिवेशने (अ. भा. मराठा शिक्षण परिषदेचा इतिहास)’ हा ग्रंथ ‘वत्सला’

साहित्य प्रकाशन संस्थेमार्फत प्रकाशित केला गेला. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अधिवेशनांचा कालावधी, ठिकाणे, अध्यक्ष व स्वागताध्यक्ष यांची संक्षिप्त माहिती पुढील टेबलमध्ये दिली आहे.

| परिषद (बैठक) क्र. | तारीख | स्वागताध्यक्ष | अध्यक्ष | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | ३०-३१ डिसेंबर १९०७ | भास्करराव विठोजीराव जाधव | खासेराव जाधव | धारवाड |
| २ | ३०-३१ डिसेंबर १९०८ | मानाजीराव कुवरजी राजेशिर्के | खासेराव जाधव | मुंबई |
| ३ | २८-३० डिसेंबर १९०९ | माधवराव शंकरराव देशमुख | श्रीमंत संपतराव गायकवाड | अमरावती |
| ४ | २७-२८ डिसेंबर १९१० | श्रीमंत संपतराव गायकवाड | शंभूसिंहजी राजे जाधवराव | बडोदा |
| ५ | २९-३० डिसेंबर १९११ | श्रीमंत लक्ष्मणराव भोसले | श्रीमंत रामराव अमृतराव डफळे | नागपूर |
| ६ | २४-२६ डिसेंबर १९१२ | सरदार बळवंतराव कदम बांडे | श्रीमंत तुकोजीराव महाराज पवार | धुळे |
| ७ | २८-३० डिसेंबर १९१३ | शंकरराव विठ्ठलराव कदम | श्रीमंत उदाजीराव महाराज पवार | नाशिक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | २७-२९ डिसेंबर १९१४ | शंभूसिंहजी राजे जाधवराव | श्रीमंत मल्हारराव पवार | पुणे |
| ९ | २६-२८ डिसेंबर १९१५ | श्रीमंत शिवराम भवानराव थोरात | श्रीमंत आप्पासाहेब घोरपडे | अहमदनगर |
| १० | २७-२९ डिसेंबर १९१६ | श्रीमंत यशवंतराव प्रतापराव गुजर | श्रीमंत खासेसाहेब महाराज पवार | सातारा |
| ११ | २७-२९ डिसेंबर १९१७ | रावबहादूर केशवराव देशमुख | श्रीमंत छत्रपती शाहू महाराज | खामगाव |
| १२ | ०५-०७ डिसेंबर १९१९ | रावबहादूर सेतूराम पवार | श्रीमंत माधवराव शिंदे | धार |
| १३ | ११-१३ एप्रिल १९२१ | श्रीमंत माधवराव शिंदे | श्रीमंत उदाजीराव महाराज पवार | ग्वाल्हेर |
| १४ | ०६-०८ मे १९२२ | शंकरराव झुंजारराव | श्रीमंत बाळासाहेब शितोळे | कल्याण |
| १५ | २५-२७ डिसेंबर १९२२ | रावबहादूर दाजीराव विचारे | श्रीमंत तुकोजीराव महाराज पवार | रत्नागिरी |
| १६ | २७-२९ डिसेंबर १९२३ | श्रीमंत नारायणराव निंबाळकर | श्रीमंत छत्रपती राजाराम महाराज | बेळगाव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | ११-१२ एप्रिल १९२५ | रावसाहेब तात्यासाहेब पवार | श्रीमंत मालोजीराजे घोरपडे | कोरेगाव |
| १८ | २४-२५ एप्रिल १९२६ | बाळकृष्णराव पुरुषोत्तम साळुंके | श्रीमंत जगदेवराव महाराज पवार | कारवार |
| १९ | २५-२७ डिसेंबर १९२६ | श्रीमंत जगदेवराव महाराज पवार | पांडुरंगराव चिमणाजी पाटील | देवास (सीनिअर) |
| २० | ०७-०८ एप्रिल १९२८ | बुवासाहेब भवानराव पिलिवकर | भास्करराव विठोजीराव जाधव | सोलापूर |
| २१ | २९-३० डिसेंबर १९२९ | तुकाराम रामजी पाटील | श्रीमंत तुकोजीराव महाराज पवार | जळगाव |
| २२ | १५-१७ एप्रिल १९३३ | नथू राघव पाटील | श्रीमंत तुकोजीराव महाराज पवार | मलकापूर (वऱ्हाड) |
| २३ | २३-२४ मे १९३६ | बाळकृष्णराव विठ्ठलराव जाधव | श्रीमंत विजयसिंहराव डफळे | महाड (कुलाबा) |
| २४ | २७-२९ मे १९३८ | रावबहादूर विठ्ठलराव ठुबे | रावबहादूर बाळकृष्णराव जगताप | पुणे |
| २५ | २५-२६ डिसेंबर १९३९ | नारायणराव बालाजीराव पाटील | रावबहादूर विठ्ठलराव ठुबे | अमरावती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | ११-१३ एप्रिल १९४१ | श्रीमंत रघोजीराव भोसले | श्रीमंत यशवंतराव घोरपडे | नागपूर |
| २७ | २५-२६ डिसेंबर १९४३ | रावसाहेब श्रीधरराव राणे | श्रीमंत यशवंतराव घोरपडे | मुंबई |
| २८ | ०८-१० मे १९४८ | रावसाहेब भाऊसाहेब थोरात | श्रीमंत जयसिंगराव घाटगे | नाशिक |
| २९ | २६-२८ मे १९५१ | टी.एल. गंगोजीराव साळुंखे | श्रीमंत शिवरामराव खेमसावंत भोसले | बंगलोर |
| ३० | २-३ मे १९५३ | डॉ. दत्ताजीराव धनवडे | डॉ. पंजाबराव देशमुख | कोल्हापूर |
| ३१ | ५ जून १९५८ | श्री. रावसाहेब थोरात | डॉ. पंजाबराव देशमुख | मालेगाव |
| ३२ | ७- ८ जानेवारी १९६२ | समाजभूषण पंढरीनाथ पाटील | श्रीमंत फत्तेसिंहराव गायकवाड | अमरावती |
| ३३ | २०-२१ नोव्हेंबर १९६६ | श्री. हनुमंत बाळासाहेब काळे | गुरुवर्य बाबूरावजी जगताप | अहमदनगर |
| ३४ | २६-२७ जानेवारी १९६८ | श्री. मारुतीराव रकमाजी कारले | लोकनेते बाळासाहेब देसाई | पुणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५ | १९-२० जानेवारी १९७४ | - | लोकनेते बाळासाहेब देसाई | मुंबई |

वरील यादी डोळ्याखालून घातली असता या परिषदेचे जन्मस्थळ बडोदा होते हा निष्कर्ष निघतो. कारण या परिषदेच्या पहिल्या तीन अधिवेशनांचे अध्यक्षपद खासेराव आणि संपतराव यांच्या माध्यमातून बडोद्याकडे होते. तर पुढे फत्तेसिंहराव गायकवाड हे १९६२ च्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. हे संदर्भ अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या निर्मितीतील बडोद्याचे निर्णायक स्थान सिद्ध करतात. गंगारामभाऊंच्या माध्यमातून १८८५ पासून मराठ्यांना ज्ञानमार्गी करण्यासाठी सयाजीरावांनी सुरू केलेल्या सातत्यपूर्ण कामाचा परिपाक म्हणूनच अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचा जन्म झाला आणि ती बहरली. परंतु आज मागे वळून पाहताना हे वास्तव या परिषदेच्या अधिकृत इतिहासात जेवढ्या प्रभावीपणे नोंदवायला हवे होते तेवढे नोंदवले गेले नसल्याची खंत मात्र वेदना देते.

## सयाजीरावांचे बौद्धिक नेतृत्व

१९०७ मधील धारवाड येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष खासेराव जाधव होते. त्यांचे अध्यक्षीय भाषण अत्यंत मूलगामी चिंतनाचा प्रत्यय देते. या भाषणात त्यांनी व्यक्त केलेले विचार पुरोगामी महाराष्ट्राचे बौद्धिक नेतृत्व सयाजीराव कसे करत होते याचे स्पष्टीकरण

देतात. या अध्यक्षीय भाषणात खासेराव जाधव म्हणतात, “श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांनीही आपल्या राज्यात ग्रामपंचायती स्थापण्याचा विचार चालविला असून बडोद्याकडील यासंबंधाची माहिती मिळविण्याचे काम सुरू केले आहे. मला चांगल्या आधारावरून समजते. याचप्रमाणे सक्तीचे शिक्षण देण्याची सुबुद्धी त्यास होवो अशी माझी ईश्वराजवळ प्रार्थना आहे.”

शाहू महाराजांनी सयाजीरावांचे अनुकरण करावे अशी अपेक्षा या भाषणात खासेराव व्यक्त करतात. खासेरावांची ही अपेक्षा १९१८ मध्ये सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा बडोद्याचा कायदा जसाच्या तसा कोल्हापूर मध्ये लागू करून शाहू महाराजांनी पूर्ण केली. अपवाद म्हणजे काही कारणास्तव मुलींना शाहू महाराजांनी या कायद्यातून वगळले होते. तर ग्रामपंचायत कायदा मात्र शाहू महाराजांच्या कारकिर्दीत लागू होऊ शकला नाही. पुढे त्यांचे उत्तराधिकारी राजाराम महाराजांनी १९ जुलै १९२७ रोजी लागू करून खासेरावांच्या अपेक्षांची पूर्ती केली.

याच भाषणात पुढे खासेराव जाधव म्हणतात, “श्रीमंत गायकवाड सरकारचा कित्ता श्रीमंत अलिजा बहादूर शिंदे सरकार आणि श्रीमंत शाहू छत्रपती महाराज गिरवितात हे पाहून आपण हाती घेतलेल्या कामी आपल्यास यश मिळण्यास साधनांची उणीव नाही.” खासेरावांचे वरील विधान राजर्षी शाहू सयाजीरावांच्या धोरणांचा अगदी सुरुवातीपासूनच पाठलाग करत होते हे स्पष्ट करणारे आहे.

स्थापनेपासून अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे खंबीर पाठीराखे असणाऱ्या सयाजीराव महाराजांचे १९३९ मध्ये निधन झाले. यानंतर १० वर्षांतच या संस्थेबरोबरच मराठ्यांच्या जडणघडणीत असणारे सयाजीरावांचे योगदान महाराष्ट्र विसरला. मे १९४८ मध्ये नाशिक येथे झालेल्या २८ व्या अधिवेशनापासून अधिवेशनाचे अध्यक्ष आणि स्वागताध्यक्ष यांच्या भाषणात सयाजीरावांना वगळून केवळ शाहू महाराजांचा 'जयघोष' सुरू झाला. यामुळे मराठ्यांच्या पुढील पिढीसमोर इतिहासाची केवळ एकच बाजू आली. वेळीच सयाजीराव महाराजांना 'जोडून' घेत 'वस्तुनिष्ठ' इतिहास सांगितला गेला असता तर मराठ्यांवर नैराश्याच्या डोहात 'घुटमळण्याची' वेळ आली नसती. इतिहासाबाबतचा हा स्मृतिभ्रंशाचा रोग एवढ्या कमी काळात ज्या जातीला जडतो ती जात इतिहासातून बोधही घेऊ शकत नाही आणि प्रेरणाही घेऊ शकत नाही असे खेदाने म्हणावेसे वाटते. या स्मृतिभ्रंशाचा आजचा संदर्भ द्यायचा झाला तर मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचे देता येईल.

गंगारामभाऊंची डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन, १८८७ मध्ये केळूसकर गुरुजी व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'मराठा-ऐक्येच्छू सभा' या नावाने स्थापन केलेली मराठ्यांसह ब्राह्मणेतरांच्या उन्नतीसाठीची संस्था यावर आपल्या इतिहासात फारच ओझरती माहिती उपलब्ध आहे. या संस्थांनी केलेले काम पायाभूत असूनसुद्धा आपला इतिहास या संस्थांची दखल

घेत नाही ही बाब गंभीर आहे. आजच्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनात आणखी एक महत्त्वाची व्यक्ती बेदखल आहे. ती म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुख. डॉ. पंजाबराव देशमुखांनी घटना समितीचे सदस्य म्हणून काम करत असताना इतर मागास जातींच्या आरक्षणाचा आग्रह धरला. यामध्ये त्यांनी कुणबी, कुणबी-मराठा या जातीचा समावेश केला. त्यामुळे ओ.बी.सी. आरक्षणाचे जनक डॉ. पंजाबराव देशमुख आहेत.

१९९० नंतर मंडल आयोगाच्या अंमलबजावणीने ओ.बी. सी. जात समूहाने भारतीय राजकारणाचा चेहरा-मोहरा बदलला. ओ.बी.सी. संघटना झपाट्याने वाढल्या. परंतु या सर्व चळवळीत पंजाबरावांचा उल्लेखसुद्धा होत नाही. यापेक्षा दुर्दैवाची बाब म्हणजे कुणबी-मराठ्यांचा समावेश ओ.बी.सी. मध्ये झाल्यामुळे मराठ्यांनी जुन्या नोंदी शोधून कुणबी किंवा कुणबी-मराठा असे जातीचे दाखले काढत देश पातळीवरील प्रशासकीय सेवा, प्रवेश परीक्षा आणि निवडणुकांसाठी या तरतुदीचा चांगला लाभ घेतला. परंतु मराठा आरक्षणाच्या आंदोलनानेसुद्धा कधीही पंजाबरावांचे नाव घेतले नाही. आपल्या इतिहासाबद्दलचे हे अज्ञान फारच घातक आहे. कारण इतिहासाच्या अज्ञानामुळे आपल्या परंपरेचे भान विकसित होत नाही. परंपरेचे भान नसेल तर भविष्य दिशाहीन होते. मराठा आरक्षणाचा संघर्ष दिशाहीन होऊ नये एवढीच अपेक्षा.

१० मे १९१४ रोजी शाहू महाराजांनी हुजूर हुकुमाद्वारे शेतकी शिक्षणासाठी अमेरिकेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना संबंधित विद्यार्थ्यांची जमीन तारण घेऊन बिनव्याजी कर्ज देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु सयाजीरावांनी १८८१ ला राज्यकारभार हाती घेतल्यानंतर ३ वर्षांतच १८८४ ला खासेराव जाधवांना शेतकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन इंग्लंडला पाठवले होते. म्हणजेच शाहू महाराजांच्या ३० वर्षे अगोदर सयाजीरावांनी हा आदर्श निर्माण केला होता.

## महाराजा सयाजीराव : राजर्षी शाहूंच्या आरक्षण धोरणाचे पूर्वसुरी

शाहू महाराजांनी १९०२ ला ब्राह्मणेतरांसाठी संस्थानी नोकऱ्यांत ५०% जागा राखून ठेवण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतला. त्यामुळेच आपण त्यांना 'भारतातील आरक्षणाचे जनक' असे म्हणतो. परंतु १८८५ पासूनच सयाजीरावांनी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या माध्यमातून मराठा जातीतील विद्यार्थ्यांच्या शालेय शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंतच्या शिष्यवृत्त्यांसाठी जे भक्कम आर्थिक पाठबळ उभे केले त्यातून मराठा जातीतील पदवीधरांची एक 'फौज'च तयार झाली. याच फौजेतील ३२ लोक शाहू महाराजांच्या प्रशासनात त्यांच्या आरक्षण धोरणाचा लाभ घेण्यासाठी 'पात्र' ठरू शकले हे वास्तव मात्र आपण नाकारले.

डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन असो, अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद असो किंवा बडोद्यातील मराठा फंड असो या सर्व माध्यमातून सयाजीरावांनी शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्तीद्वारे शाहू महाराजांच्या नोकरीतील आरक्षण धोरणाअगोदर १७ वर्षे शिक्षणातील आरक्षणाचे धोरण कोणताही गाजावाजा न करता रचनात्मक पद्धतीने राबवले होते.

याबरोबरच बडोद्याने राबवलेले शिष्यवृत्ती धोरण आजअखेर महाराष्ट्राने अभ्यासले नाही. ते व्यवस्थित अभ्यासले गेले असते तर भारताच्या आरक्षण धोरणाला त्यातून 'संतुलित' मार्गदर्शन लाभले असते. परिणामी माजी अस्पृश्य जातींसाठीच्या आरक्षण धोरणाच्या द्वेषातून उभे राहिलेले आजचे मराठा आरक्षण आंदोलन जातीय संघर्षाच्या दिशेने गेले नसते. कारण महाराजांनी आपल्या शिष्यवृत्ती धोरणात गुणवत्ता, गरज आणि 'जातनिरपेक्ष मागासलेपण' यांचे उत्तम संतुलन साधले होते. त्यामुळे या धोरणावर जातीयवादाचा शिक्का कोणालाही मारता आला नाही. महत्त्वाचे म्हणजे शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देत असतानाच शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीची १००% हमीसुद्धा बडोद्याच्या शिष्यवृत्ती धोरणाने दिली होती. शाहू महाराजांच्या ५०% आरक्षण धोरणाचा बडोद्याच्या शिष्यवृत्ती धोरणाशी जोडून विचार केला तर सयाजीरावांचे आरक्षण किती व्यापक आणि रचनात्मक होते याची साक्ष पटेल.

या पार्श्वभूमीवर २० मार्च १९३३ ला पुण्यातील मराठा समाजाने सयाजीरावांना दिलेल्या मानपत्राला उत्तर देताना महाराजांनी व्यक्त केलेले विचार त्यावेळच्या परिस्थितीपेक्षा आजच्या परिस्थितीलाच जास्त लागू होतात असे वाटते. कारण भारतातील सामाजिक न्यायाच्या धोरणातील असंतुलित आणि टोकाच्या भूमिकेमुळे आज जातीय संघर्ष तीव्र करण्याची संधी जातिव्यवस्थेच्या समर्थकांना नकळतपणे या धोरणाने उपलब्ध करून दिली. या भाषणात सयाजीराव म्हणतात, "कोणत्याही एकाच जातीस उत्तेजन देणे केव्हाही श्रेयस्कर होणार नाही. राष्ट्र व जात यांच्यामधील संबंध हात आणि बोटे यांच्याप्रमाणे आहे. सर्व बोटे सारखी नाहीत; परंतु सर्व बोटे एकमेकांशी सहकार्य केले व मूठ वळविली तरच हातास योग्य कार्य करता येते. परंतु ज्या जाती आहेत त्यांना उत्तेजन देणे आवश्यक आहे. मात्र या बाबतीत proportion म्हणजे प्रमाण पाहिले पाहिजे. ज्या प्रमाणात एखादी जात मागासली असेल तेवढ्याच प्रमाणात तिला उत्तेजन द्यावे. तसे करणे न्याय ठरेल."

## महाराजा सयाजीराव : 'जातमुक्त' एकमेव प्रशासक

सयाजीराव हे भारतातील एकमेव 'Decaste' झालेले प्रशासक होते हे त्यांच्या वरील चिंतनातून स्पष्ट होते. कोणतीही एक जात किंवा धर्म सयाजीरावांवर दावा सांगू शकत नाही.

बहुतेक त्यामुळेच भारतातील कोणत्याही चळवळीचे ते 'आयकॉन' होऊ शकले नसावेत. मे १९४८ मध्ये नाशिक येथे झालेल्या अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या २८ व्या अधिवेशनापासून अधिवेशनाचे अध्यक्ष आणि स्वागताध्यक्ष यांच्या भाषणात सयाजीरावांना वगळून केवळ शाहू महाराजांचा 'जयघोष' सुरू झाला. याला ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची किनार होती. या वादाने अकारण ब्राह्मणद्वेषाची चळवळ गतिमान केली. त्याचे परिणाम आज स्पष्ट दिसत आहेत. या सर्व घटनांच्या एकत्रित परिणामातून झालेली कोंडी फोडायची असेल तर सयाजीरावांच्या धोरणातील सकारात्मकता आणि सर्वसमावेशकता हाच 'एकमेव' उपाय आपल्यासमोर उरतो. मराठा जातीच्या उत्कर्षासाठी सयाजीरावांनी प्रचंड काम करूनसुद्धा त्यांच्यावर मराठा जातीयवादाचा आरोप का करता येत नाही याचे उत्तर महाराजांच्या वर उद्धृत केलेल्या भाषणात सापडते.

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे उद्गाते असणारे महाराजा सयाजीराव गायकवाड यांची महाराष्ट्राने योग्य नोंद घेतली नाही. त्यांच्या धोरणांचा संस्कार यशवंतराव चव्हाणांचा अपवाद वगळता आपल्या राज्यकर्त्यांना महत्त्वाचा वाटला नाही. कारण आपल्या बुद्धिजीवींनी आपल्या ऊर्जादायी इतिहासाची

‘जवळच्या फायद्या’साठी जी मोडतोड केली त्याचाच हा परिणाम आहे. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास ‘संवादी जोडइतिहास’ संकल्पनेच्या आधारे पुन्हा लिहिल्याशिवाय आपल्याला पर्याय नाही.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
 - धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
 - धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
 - सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
 - दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
 - डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
 - सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
 - पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
 - बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सयाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
 - बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●